| MHKO190000512024 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | २३/०१/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | :- | २३/०१/२०२४ |
| | निकाल दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०२ ०१ २३ |

| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात<br>(पीठासीन अधिकारी एन. पी. काकडे)<br>न्यायनिर्णय घोषित दिनांक – १६ मार्च,२०२६<br>(नियमित फौजदारी खटला क्र.११/२०२४) (नि.क्र.२३) | | |
|---|---|---|
| गुन्हा नोंद क्र.१८४/२०२३, पोलीस ठाणे राधानगरी, जि.कोल्हापूर | | |
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, राधानगरी |
| अभियोग पक्षातर्फे | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. कांबळे |
| आरोपी | | **१. अमोल रामचंद्र पोवार**<br>वय – ३१ वर्षे,<br>राहणार- बारडवाडी, ता-राधानगरी, जि-कोल्हापूर<br><br>**२. रामचंद्र सखाराम पोवार**<br>वय – ६० वर्षे,<br>राहणार- बारडवाडी, ता-राधानगरी, जि-कोल्हापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड. श्री. एस. आर. भांदिगरे |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २१/०७/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २१/०७/२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २३/०/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २०/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २५/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १६/०३/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपींना निर्दोषमुक्त करण्यात येते. |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपी चे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमोल रामचंद्र पोवार | - | - | भा.द.वि.सं. कलम ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७,३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | रामचंद्र सखाराम पोवार | - | - | -II- | -II- | -II- | -II- |

## न्या य नि र्ण य

## (घोषित दिनांक १६/०३/२०२६)

भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ अंतर्गत आरोपींवर संपरीक्षा चालविण्यात येत आहे. (यापुढे सोईकरीता भा.दं.वि. संबोधण्यात येईल.)

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे:-**

**२.** दिनांक २१.०७.२०२३ रोजी सायंकाळी १७.३० वाजताचे सुमारास आरोपी क्र.१ व २ यांनी मडकिरांग नावचे शेतामध्ये फिर्यादी यांनी रोप लावन केली असताना देखील बैलजोडीने नांगरट करू लागल्याने फिर्यादी हे आरोपी क्र. १ यास 'आम्ही शेतामध्ये रोप

लावले आहेत' असे सांगत असताना आरोपी क्र. १ व २ यांनी 'शेती आमची आहे तु शेतात रोप का केलीस' असे म्हणुन फिर्यादी यांना वाईट वंगाळ शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहान केली. त्यावेळी भांडणाचा आवाज ऐकुन फिर्यादी यांचे वडील धोंडिराम व आई लक्ष्मी, बहिण दिपाली असे फिर्यादी यांना सोडवण्याकरिता गेले असता आरोपी क्र. १ याने आपले हातातील काठीने फिर्यादी यांचे वडिल धोंडिराम यांचे डावे पायावर मारली व पाठीत लाथाबुक्क्यांनी मारहान केली. त्यावेळी फिर्यादी यांची आई लक्ष्मी व बहिण दिपाली असे वडीलांना सोडवण्याकरिता गेल्या असता बहिण दिपाली हिचे डावे हातावर आरोपी क्र.१ याने काठी मारली व फिर्यादी यांचे बहिण दिपाली व आई लक्ष्मी यांना वाईट वंगाळ शिवीगाळ केली, त्यामुळे फिर्यादीने सदर घटनेबाबत राधानगरी पोलीस ठाण्यात प्रथम खबर दाखल केली.

**३.** सदर प्रथम खबरी अहवालावरुन पोलीस ठाणे राधानगरी येथे आरोपीं विरूद्ध गुन्हा क्र. १८४/२०२३ भा.दं.वि.संहिता चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ प्रमाणे नोंदविला. तपासी अंमलदार यांनी घटनेचा तपास केला व तपास पुर्ण करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** आरोपीं विरूध्द भा.दं.वि.संहिता चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.१२ कडे दोषारोप निश्चित केला व आरोपींना त्यांचे विरुद्ध असलेल्या गुन्हयाचा तपशिल समजावून सांगितला. आरोपीने त्याचे निवेदन नोंदवुन गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली.

**५.** अभियोग पक्षाने आरोपींविरुद्धचा गुन्हा शाबित करण्यासाठी एकुण ३ साक्षीदार तपासले आहेत. अभियोग पक्षाने नि.क्र. १८ खाली पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. आरोपी विरुद्ध पुराव्यात कोणत्याही बाबी न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे चे निवेदन नि.क्र.१ वर आदेश करुन माफ करण्यात आले.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. कांबळे व आरोपींचे वकिल ॲड. श्री. एस. आर. भांदिगरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद विचाराधीन प्रश्न माझे विचारासाठी पुढे आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीचे वडील व बहिण यांस काठीने मारहाण करून जखमी केले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस आणि फिर्यादीचे वडील यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत पोहचविली व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ करुन उद्देशपुर्वक अपमानीत करुन प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्यांचे कडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा अन्य अपराध घडावा असा आरोपींचा उद्देश होता अथवा तसे होण्याचा संभव असल्याची त्यांना जाणीव होती व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ४. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा करुन धमकी दिली व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ५. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या शेताचे नुकसान केले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४२७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ६. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ बाबत</u>**:-

**८.** विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ५ एकमेकांशी सुसंगत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रीतरित्या नोंदवित आहे.

९. प्रथम खबर देणार प्रदिप (अ.सा.क्र.१) यांनी त्यांचे पुरावेत कथन केले आहे की, आरोपी क्र.१ हे त्यांचे चुलत भाऊ व आरोपी क्र.२ हे त्यांचे चुलते आहेत. कोणत्या तारखेला काय झाले हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांचेत व आरोपीत काहीही वाद नसल्याचे त्यांनी सांगितले. साक्षीदार सहकार्य करत नसल्याने अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवाणगीने साक्षीदार उलटतपासाच्या स्वरूपातील प्रश्न विचारले. परंतु साक्षीदाराने अभियोग पक्षाची सर्व कथने नाकारली आहेत.

१०. साक्षीदार धोंडीराम (अ.सा.क्र.२) यांनी त्यांचे पुरावेत कथन केले की, फिर्यादी हा त्यांचा मुलगा आहे. त्यांचेत व आरोपीत कधीही हानामारीची घटना घडलेली नाही. तसेच फिर्यादीची बहिण दिपाली (अ.सा.क्र.३) यांना अभियोग पक्षाने नि.क्र.१७ कडे तपासले असता त्यांनी देखील त्यांचे पुरावेत आरोपीने त्यांना व त्यांचे परिवारास मारहाण केली नसल्याचे कथन केले आहे. अभियोग पक्षाने विचारले असता साक्षीदारांनी अभियोग पक्षाची सर्व कथने नाकारली आहेत.

११. साक्षीदाराचे पुरावे वाचता साक्षीदाराने अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. सदर साक्षीदाराने आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबीत होईल असा कोणताही पुरावा या प्रकरणात दिलेला नाही. अभियोग पक्ष प्रथम खबर अहवाल सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. बचावपक्षाने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.१९), वैद्यकीय प्रमाणपत्रे (नि.क्र.२० ते २२) कबुल केली आहेत. परंतु, आरोपीविरुद्धचा गुन्हा पुराव्या अभावी शाबीत होत नाही. सबब, मी **विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५** चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.६ बाबत</u>:-**

१२. वर नमुद सर्व चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ५ चे निष्कर्ष विचारात घेता, आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील काठी हा मुद्देमाल विनामुल्य असल्याने अपील कालावधीनंतर विल्हेवाट लावणे न्यायोचित राहील. सबब, प्रश्न क्र.६ च्या

उत्तरासाठी खालील आदेश पारीत करण्यात येतो:

**- आ दे श -**

**१.** आरोपी क्र. **१. अमोल रामचंद्र पोवार** आणि **२. रामचंद्र सखाराम पोवार** यांस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंडविधान,१८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपींचे वैयक्तीक जात मुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येत आहेत.

**३.** आरोपीला असे निर्देश देण्यात येतात की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ ची पुर्तता करण्यासाठी त्यांनी रु.१५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र सादर करावे.

**४.** सदर गुन्हयातील जप्त काठी या मुद्देमालाची, विनामुल्य असल्याने, अपील कालावधीनंतर विल्हेवाट लावणे.

***(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)***

Sd/-

ठिकाण : राधानगरी **(एन. पी. काकडे)**

दिनांक : १६/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.२) राधानगरी.

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

### सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

**१) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी-**

**अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रदिप धोंडीराम पोवार | फिर्यादी | १४ |
| २. | धोंडीराम भैरू पोवार | जखमी साक्षीदार | १६ |
| ३. | दिपाली सुनिल साबळे | जखमी साक्षीदार | १७ |

**ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी- निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी- निरंक**

**२) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)-**

**अ. अभियोग पक्ष निशाणी -**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १९ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | २० ते २२ | वैद्यकीय प्रमाणपत्रे |
| २. | १८ | अभियोग पक्षातर्फे पुरावा संपलेची पुरसीस |

**ब. बचाव पक्ष निशाणी- निरंक**

**क. न्यायालयातर्फे निशाणी-**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १२ | आरोपींचे निवेदन |

ड. सामग्री वस्तू- निरंक